महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र. मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/९१८३
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २९/०४/२०२१

# शुध्दीपत्रक

(परिपत्रक क्र.९०७९ दि.२८.०४.२०२१)

**विषय : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा वर्धापन दिन समारंभ -१ मे, २०२१.**

**संदर्भ :** १) मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/ ९०७९ दि. २८.०४.२०२१.
२) शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२१/प्र.क्र.३४/३० दि.२८.०४.२०२१.

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दि.०१ मे, २०२१ रोजी ६१ वर्षे पुर्ण होत आहेत. कोरोना (COVID-१९) या विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी या वर्षी राज्यात **"महाराष्ट्र दिन"** हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजित करणेबाबत शासनाच्या मागील वर्षीच्या सुचनांच्याधर्तीवर महावितरण कंपनीमध्ये साजरा करणेकरीता कंपनीचे परिपत्रक क्र. मासं/रवका/न.क्र.९/कोवीड-१९/ ९०७९ दि. २८.०४.२०२१ निर्गमित करण्यात आलेले होते.

२. आता, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२१/प्र.क्र.३४/३० दि.२८.०४.२०२१ अन्वये नव्याने सुचना पारित करण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांच्या अनुषंगाने ध्वजारोहण फक्त जिल्हा मुख्यालयात होणार असल्याने महावितरण कंपनीच्या कोणत्याही कार्यालयात **"महाराष्ट्र दिन"** हा कार्यक्रम साजरा करण्यात येवू नये तथापी, ध्वजारोहण करावे.

३. सबब, परिपत्रक क्र.९०७९ दि.२८.०४.२०२१ मधील परिच्छेद क्र. ३ मधील सुचना कायम राहतील. सर्व सक्षम अधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर पूरकपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत - शासन परिपत्रक दि.२८.०४.२०२१

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)(अ.का.)

CS Scanned with CamScanner

**महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा**
**वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२१**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर-२०२१/प्र.क्र.३४/३०
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख :२८ एप्रिल, २०२१.

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्यामध्ये कोरोनाबाधितांची वाढती रुग्ण संख्या विचारात घेवून कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठी (Break The Chain) व सदर विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने दि.१३ एप्रिल,२०२१ च्या आदेशान्वये **दि.१ मे,२०२१ च्या सकाळी ७.०० वाजेपर्यंत** राज्यात संचारबंदीसह कडक निर्बंध लागू केलेले आहेत. कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठीच्या तरतूदी विचारात घेवून राज्यात महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा वर्धापन दिन समारंभ गतवर्षी प्रमाणेच, अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१) जिल्हा मुख्यालयात केवळ एकाच ठिकाणी सकाळी ८.०० वा. फक्त ध्वजारोहण करण्यात यावे. विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती यांनी ध्वजारोहण समारंभाकरीता योग्य ती व्यवस्था करावी. तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी ध्वजारोहणाचा वेगळा कार्यक्रम आयोजित करु नये. इतर सर्व जिल्ह्यात केवळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्यलयाच्या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात यावे.

२) वरील नमुद ठिकाणी केवळ पालकमंत्री, विभागीय आयुक्त मुख्यालयी समारंभ असल्यास विभागीय आयुक्त, महापौर/नगराध्यक्ष,जिल्हाधिकारी, ज्या ठिकाणी पोलीस आयुक्तालय आहे त्या ठिकाणचे पोलीस आयुक्त, आयुक्त, महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधिक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद एवढयाच पदाधिकारी/अधिकारी यांनी उपस्थित रहावे. इतर मान्यवरांना आमंत्रित करण्यात येवू नये.

३) कवायती/संचलन आयोजन करण्यात येवू नये.

४) विधीमंडळ, मा.उच्च न्यायालय व इतर संविधानिक कार्यालयांमध्ये कमीत कमी उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात यावे.

५) ध्वजारोहण करणारे पालकमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित राहू न शकल्यास, विभागीय आयुक्त मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी व जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण करावे.

६) आपत्ती व्यवस्थापन विभागाने कोविड-१९ च्या अनुषंगाने दिलेल्या सुरक्षित वावर व इतर सर्व नियमाचे काटेकोर पालन करण्यात यावे.सर्वांसाठी मास्क बंधनकारक राहील, याची दक्षता घेण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(राजेंद्र गायकवाड )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -:**
मा.मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,
सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई .
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग (मंत्रालयीन विभागाच्या खालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांना कळविण्याच्या विनंतीसह)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, फोर्ट, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व पोलीस उप महानिरिक्षक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद